महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/५९२१
दिनांक :- २७/११/२०२०

-:आदेशः-

विषय :- पुणे महानगरपालिककेच्या मालकीच्या जागा विकसित करणेकामी समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/४२६, दिनांक २७/११/२०२०.

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर अतिक्रमण होऊन झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती मोठया प्रमाणात निर्माण झालेली आहे. सदर जागेवरील अतिक्रमण सदृश्य झोपडया हया जुन्या व संरक्षित असल्याने त्यावरील अतिक्रमण काढणे गैरसोयीचे व अडचणीचे ठरत आहे. दि.९ नोव्हेंबर २०२० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या समवेत झालेल्या बैठकीत पुणे मनपाच्या २२ जागांवर अशाप्रकारे अतिक्रमण होऊन झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याचे व हया जागांच्या विकसनसंदर्भात योग्य ते धोरण ठरवून तात्काळ कार्यवाही करणे हे अत्यंत आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर जागांचे विकसन होण्याच्या दृष्टीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र व पुणे महानगरपालिका यांचे मार्फत संयुक्त कार्यवाही करण्याचे कामी समन्वय राखणे, पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या व झोपडपट्टी झालेल्या जागांच्या विकसनासाठी धोरण ठरविणे सदर जागा झो.पु.प्रा. मार्फत विकसित करणे कामी पुणे म.न.पा. तील विविध विभागांशी समन्वय ठेवणे, तसेच त्या जागा विकसित करण्याच्या दृष्टीने सर्व ती कार्यवाही करणे या कामकाजासाठी श्रीमती. वनश्री लाभशेटवार उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन) यांचे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करणेत येत आहे.

श्रीमती. वनश्री लाभशेटवार, उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन) यांनी उप आयुक्त (मालमत्ता व व्यवस्थापन) आणि उप आयुक्त (झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन) यांचे सह पुणे म.न.पा. तील विविध विभागांशी समन्वय साधून उपरोक्त कामकाज करावयाचे आहे.

श्रीमती वनश्री लाभशेटवार, उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन) यांनी उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त कामकाज स्विकृत केलेबाबतचे निवेदन आमचे विभागाकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :- खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी...